# अर्थशास्त्र विभाग अहवाल

(सत्र : २०१९-२०)

**प्रा.डॉ.रवि एस.सोरते**

(अर्थशास्त्र विभागप्रमुख)

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयात **“अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन”** करण्यात आले. या प्रसंगी उद्घाटक म्हणून माजी प्राचार्य एन. आर. उमाठे उपस्थित होते. यांनी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करुन ५ विद्यार्थ्यांचे अभ्यास मंडळ स्थापन करण्यात आले. अर्थशास्त्र अभ्यास मंडळ स्थापन करण्याचा उद्देश असा की, विद्यार्थीजीवनात त्यांना निर्माण होणाऱ्या समस्या सोडवून घेण्यासाठी तसेच विषयांशी संबंधित एखादया प्रश्नावर चर्चा घडवून आणणे व निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न असतो. विद्यार्थ्यांमध्ये अर्थशास्त्राची जागृकता व ज्ञान निर्माण करणे तसेच दैनंदिन आर्थिक घडामोडींचा अभ्यास जाणून घेण्याच्या दृष्टीने अर्थशास्त्र अभ्यास मंडळ महत्वाचे आहे.




या विद्यार्थ्यांच्या व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन सत्राअंतर्गत करण्याचे ठरले. या कार्यक्रमामध्ये बॅक व्हिजीट, औद्योगिक भेटी, बाजारपेठेला भेट, अंदाजपत्रक तयार–वाचन करणे इत्यादी ठरले. माजी प्राचार्य एन.आर.उमाठे यांनी आपल्या उद्घाटनपर मार्गदर्शनात विविध उपक्रम राबवावे, नुकताच पार पडलेला केंद्रीय अर्थसंकल्प २०२० चा आपल्या जिवनात कसा उपयोग करुन घ्यावयाचा हे आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात सांगितले.

अर्थशास्त्र अभ्यास मंडळ स्थापन करीत असतांना विद्यार्थ्यांची कार्यकारणी गठीत करण्यात याच्यामार्फत संपूर्ण सत्रात विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | — | श्री राजेश धर्माधिकारी | बी.ए.भाग–३ |
| सचिव | — | श्री शुभम तीजारे | बी.ए.भाग–३ |
| सदस्य | — | श्री सचिन सनतापे | बी.ए.भाग–२ |
| सदस्य | — | कु. पुष्पलता घुसे | बी.ए.भाग–२ |
| सदस्य | — | कु. दुर्गा कुमरे | बी.ए.भाग–१ |

सत्र २०१९—२० मध्ये अर्थशास्त्र विभागाअंतर्गत विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्ती करुन देण्याच्या उद्देशाने वर्गामध्ये वादविाद, सेमिनार तसेच पॉवर पॉइट प्रेझेंटेशन घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर घालण्याच्या उद्देशाने अर्थशास्त्र विषयाशी संबधीत प्रतियोगिता साहित्य सिरीज (अर्थशास्त्र), अर्थसंवाद, योजना, कुरुक्षेत्र, अर्थमिमांसा, अर्थविश्व इ. मासिक व संदर्भ साहित्य पुस्तिका उपलब्ध करुन देण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. ए. जवंजाळ तर



अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. रवी सोरते व ग्रंथालय विभाग प्रमुख श्री. सतिश चंदेल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता महाविद्यालयातील प्रा. डॉ.अजय चिकाटे, प्रा.डॉ. विजय राऊत, प्रा.डॉ. सूधीर नारनवरे, प्रा.डॉ. सुधाकर पवार, प्रा.डॉ. समीर पाहुणे, प्रा.डॉ. रामेश्वर पाठेकर, प्रा. प्रशांत सावरकर, प्रा. अशोक मदनकर, प्रा.शिरीष खोबे, राहूल धुर्वे यांनी सहकार्य केले. महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे तसेच वाणिज्य विभागाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

तसेच अर्थशास्त्र अभ्यास मंडळाअंर्तगत महाविद्यालयात दिनांक ०७ फेब्रुवारी २०२० ला ग्रंथालय माहितीशास्त्र व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालयात अंदाजपत्रक २०२० या विषयवार बी.ए. भाग—३ व बी.कॉम.भाग—१ च्या विविध विद्यार्थ्यांनी तयार केलेली **“केंद्रीय अंदाजपत्रक २०२०”** चे भित्तीचित्रे ग्रंथालयात प्रदर्शित करण्यात आली. या भित्तीपत्रकाच्या माध्यमातून भारतीय अंदाजपत्रकाचे संक्षिप्त स्वरुप विद्यार्थ्यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. या प्रदर्शनीतून महाविद्यालयातील प्राध्यापकांना तसेच विद्यार्थ्यांना अंदाजपत्रक म्हणजे



काय? ते कसे असतात? त्याचा आपल्या जिवनात कसा उपयोग करावा? याचे ज्ञान देण्याचा प्रयत्न या भित्तीपत्रकाच्या माध्यमातून देण्यात आला. यामध्ये महाविद्यालयातील संपूर्ण विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदविला.

ग्रंथप्रदर्शनी व भित्तीपत्रक प्रदर्शनीचे उद्घाटन माजी प्राचार्य एन. आर. उमाठे सर यांनी केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. रवी सोरते व ग्रंथालय विभाग




प्रमुख सतिश चंदेल यांच्या मार्गदर्शनाअंतर्गत विद्यार्थ्यांनी **"ग्रंथप्रदर्शनी व भित्तीचित्र प्रदर्शनीचे आयोजन"** केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. ए. जवंजाळ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा.डॉ.अजय चिकाटे, प्रा.डॉ. विजय राऊत, प्रा.डॉ. सूधीर नारनवरे, प्रा.डॉ. सुधाकर पवार, प्रा.डॉ. समीर पाहुणे, प्रा.डॉ. रामेश्वर पाठेकर, प्रा. प्रशांत सावरकर, प्रा. अशोक मदनकर, प्रा.शिरीष खोबे, राहूल धुर्वे यांनी सहकार्य केले.

ग्रंथप्रदर्शनी व भित्तीचित्र प्रदर्शनी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमास सहाय्यक ठरावी अशी होती. या प्रदर्शनीचा लाभ महाविद्यालयीन सर्व विद्यार्थ्यांनी घेतला.



**विद्यार्थ्यांनी साकारले भारतीय अंदाजपत्रक २०२० चे प्रदर्शन**

**नरखेड:** स्थानिक श्री पंढरीनाथ कला-वाणिज्य महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र व ग्रंथालय शास्त्र माहिती विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अंदाजपत्रक २०२० या विषयावरील पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. 'अंदाज २०२०' या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केंद्रीय अंदाजपत्रक २०२० मध्ये रेल्वे, कृषी, उद्योग, आयकर, व्यवसाय कर, आंतरराष्ट्रीय व्यापार, रोजगार, लघुउद्योग या क्षेत्रात करण्यात आलेली आर्थिक तरतूद, यातून देशाला होणारा फायदा इत्यादीचा भित्तीपत्रकाच्या माध्यमातून माहिती साकारली होती. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना अंदाजपत्रक म्हणजे काय, ते कसे असते,त्याचा आपल्या जीवनावर काय परिणाम होतो याची माहिती देण्यात आली. प्रदर्शनाचे उद्घाटन माजी प्राचार्य एन.आर. उमाठे यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.ए. जंवजाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवि सोरते, ग्रंथपाल सतीश चंदेल यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील डॉ. अजय चिकाटे, डॉ. विजय राऊत, डॉ. सुधीर नारनवरे, डॉ. सुधाकर पवार, डॉ. समीर पाहूणे, डॉ. रामेश्वर पाठेकर, प्रशांत सावरकर, अशोक मदनकर, राहूल धुर्वे, विवेक बालपांडे, मनोज गायधने, शैलेश नारनवरे, गणेश उईके यांनी सहकार्य केले.

Hello Nagpur Gramin
Page No. 3 Feb 27, 2020
Powered by: erelego.com

# Online Banking Competitive Examination -2019:2020

आजचा काळ हा स्पर्धेने  युक्त आहे , या काळात टिकाव धरून राहायचे असल्यास आपल्याला सुद्धा या स्पर्धेत भाग घेणे आवश्यक आहे व तशी तयारी सुद्धा करावी लागणार आहे. याकरिता अर्थशास्त्र विषयाच्या तसेच इतर विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांकरीता वर्तमान काळात मोठ्या प्रमाणात बँकिंग क्षेत्रामध्ये भरती निघत असताना आपल्याला बॅकिंग विषयीची संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एक छोटासा प्रयत्न म्हणून बँकिंग सामान्य–ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन केलेले आहे. आपण यामध्ये सहभागी होऊन तसेच आपण स्पर्धा परीक्षा मध्ये टिकाव धरून राहण्याकरिता **बँकिंग सामान्यज्ञान परीक्षा– 2020** घेण्यात आली. यामध्ये सर्वांनी भाग घेऊन आपल्या अर्थशास्त्र व बँकिंग विषया विषयी ज्ञानात भर पडेल अशी अपेक्षा या स्पर्धेच्या माध्यमातुन करण्यात आली. की , त्यामुळे जेव्हा सर्व विद्यार्थी बँकिंग स्पर्धा परीक्षेला समोर जाईल, तेव्हा त्यांना सहज स्पर्धेला तोंड देता येईल हाच या परीक्षे मागील उद्देश होता. या बँकिंग सामान्यज्ञान परीक्षा– 2020 मध्ये ऐकुन 185 विद्यार्थ्यांनी भाग घेण्यात आला. त्या याकरिता Online सहभाग प्रमाणपत्र सुध्दा देण्यात आले.

# Covid-19 Student Awareness Programme (2019-2020)

Covid-19 विषाणु च्या काळात स्वतःची जबाबदारी ओळखून घरामध्ये आनंदी राहण्याचा प्रयत्न करीत कोरोना विषाणुशी लढा देणे प्रत्येकाचे कर्तव्य होते. कारण संपूर्ण जगाला Covid-19 हा विषाणु नविन होता. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने अर्थशास्त्र विभागाअंतर्गत Covid-19 Student Awareness Programme-2020" राबविण्यात आला. यामध्ये ऐकुन 164 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्या याकरिता Online सहभाग प्रमाणपत्र सुध्दा देण्यात आले.